# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

<u>**प्रसिद्धी पत्रक**</u> **ता. २८ नोव्हेंबर २०१९**

# तक्रार निवारण शिबिराची प्रक्रिया सुरू

### झोनमध्ये नोंदवा ५ डिसेंबरपर्यंत तक्रारी : १२ डिसेंबरला ‘तक्रार निवारण शिबीर’

**नागपूर, ता. २८ :** आपल्या शहराच्या समग्र विकासासाठी नागरिकांचा सहभाग महत्वाचा असून नागरिकांच्या तक्रारींवर योग्य कार्यवाही होउन त्यांचे समाधान होणेही आवश्यक आहे. याचदृष्टीने महापौर संदीप जोशी यांच्या संकल्पनेतून तक्रारींसाठी ‘तक्रार निवारण शिबीर’ घेण्यात येत आहे.

नागरिकांकडून येणा-या तक्रारींवर अनेकदा निर्देश देउनही काही कार्यवाही होत नाही. त्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. नागरिकांना त्यांच्या तक्रारीची योग्य आणि अचूक माहिती देउन त्यांचे समाधान केल्यास एकाच तक्रारीसाठी त्यांना होणारा मन:स्ताप कमी करण्याच्या दृष्टीने ‘तक्रार निवारण शिबीर’ उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक झोनस्तरावर नागरिकांच्या तक्रारी आमंत्रित करण्यात येत आहेत.

२७ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीमध्ये नागरिकांना तीन प्रतिमध्ये आपल्या तक्रारी नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक आणि तक्रारीचे सविस्तर वर्णन यासह झोनमध्ये सादर करावे लागणार आहे. यानंतर या सर्व तक्रारींवर सुनावणी करण्यासाठी १२ डिसेंबरला सिव्हील लाईन्स येथील मनपा मुख्यालयात सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेमध्ये 'तक्रार निवारण शिबीर' घेण्यात येणार आहे. या शिबीरात नागरिकांच्या तक्रारींचे पूर्णत: समाधान केले जाणार आहे. नागरिकांनी आपल्या तक्रारी झोनमध्ये नोंदविण्याचे आवाहन महापौर संदीप जोशी यांनी केले आहे.